Estd.1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक कं. 4

विषयः शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील मार्च/एप्रिल, 2021 उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासकमाच्या (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) महाविद्यालय स्तरावरील परीक्षेच्या नियोजनाबाबत.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार मार्च/एप्रिल, 2021 उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील सर्व पारंपारिक अभ्यासकमासाठी (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) विहित प्रक्रियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांच्या संबंधीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळानी मान्यता दिलेली असून, पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासकमाच्या (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे कोविड–19 च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर Online पध्दतीने नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

1. सोबत जोडलेल्या पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासकमाच्या (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. 10 ऑगस्ट, 2021 ते 15 सप्टेंबर, 2021 या कालावधीमध्ये महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर Online पध्दतीने घेण्यात याव्यात.
2. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार उपरोक्त परीक्षा प्रचलित Online स्वरूपात 50 गुणांची (प्रश्नपत्रिकमध्ये एकूण 25 प्रश्न प्रत्येकी 02 गुणांचे असावेत), 1 तास कालावधीची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने घेणेत यावी.
3. सदर परीक्षेसाठी ज्या त्या अभ्यासमंडळाने निश्चित केलेल्या अभ्यासकमावर प्रश्नपत्रिका तयार करण्यात यावी. सदर अभ्यासकमासाठी अभ्यासमंडळे विभागाने विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली परिपत्रके/पत्रे अवलोकनी घ्यावीत.
4. उपरोक्त सर्व परीक्षा महाविद्यालय/मान्यताप्रापत शिक्षण संस्था स्तरावर Online पध्दतीने होणार असल्याने ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्याच विषयाच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालातील शिक्षकाकडून तयार करून घेण्यात याव्यात. सदर शिक्षकांना प्रश्नपत्रिका तयार करण्याबाबतचे पत्र संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी द्यावे.
5. उपरोक्त पदवी (प्रथम वर्ष – प्रथम व द्वितीय सत्र) अभ्यासकमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व संपूर्ण परीक्षेचे नियोजन करून सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्याबाबतची कार्यवाही संबंधीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांनी करणेची आहे.
6. उपरोक्त परीक्षेचे वेळापत्रक तयार करतांना विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा–या पदवी (भाग 2 व 3 ) परीक्षेचे वेळापत्रक अवलोकनी घेवून प्रथम वर्ष परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात यावे.

7. परीक्षेशी संबंधीत प्रात्यक्षिक/प्रबंध/प्रकल्प/ मौखिक परीक्षा ऑनलाईन पध्दतीने संबंधीत अभ्यासमंडळाच्या सूचनेनुसार आयोजित करण्यात याव्यात. तसेच सदर परीक्षेच्या अनुषंगाने काही अडचणी उदभवल्यास संबंधीत विषयाचे बीओएस चेअरमन, मा. अधिष्ठाता यांचे मार्गदर्शन घेण्यात यावेत.

8. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या Online पध्दतीने परीक्षा आयोजित करण्यात येणार असल्याने त्याबाबतची अनुषंगिक तयारी करण्यात यावी. तसेच सदरबाबतची सूचना सर्व संबंधीतांना देणेत याव्यात.

9. विद्यापीठाकडे प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येणार असल्याने जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत. तसेच Online परीक्षा देत असतांना कोणतीही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास संबंधीत विद्यार्थ्यांची पुर्नपरीक्षा संबंधीत महाविद्यालय/क्लस्टर मार्फत तात्काळ घेण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत/गुणाबाबत कोणतीही तक्रार विद्यापीठाकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी.

10. सदर परीक्षेकामी होणारा खर्च विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या तसलमात रक्कमेमधून विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावा.

11. महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी.

12. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांचे मार्फत करणेची आहे.

13. कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल/सूचना बाबत वेळोवेळी शासन/स्थानिक प्रशासन यांनी दिलेले निर्देशाचे पालन करण्यात यावे.

14. वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/** 604
**दि.** 3 JUL 2021
प्रत:

1. मा. प्राचार्य/संचालक, सर्व पारंपारिक महाविद्यालये यांना माहितीसाठी/योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
5. इंटरनेट विभाग – सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यासाठी
6. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
7. पात्रता विभाग, पी.जी. प्रवेश विभाग – माहितीस्तव
8. जनसंपर्क अधिकारी कार्यालय – प्रसिध्दीकरीता